**जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद**
(महसूल शाखा)
मेन रोड, उस्मानाबाद पिनकोड, 413501 दुरध्वनी क्र.02472-227301
फॅक्स क्र.02472 - 228018. Email Id- rdc1osmanabad@gmail.com

2015/महसूल/जमा-2/कावि-163/सीआर-

दि. 24 /05/2018

प्रति,
..............................................
..............................................
..............................................

**विषयः- जिल्हा सेतू समिती उस्मानाबादचे सन 2017-2018 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करणेसाठी सनदी लेखापालाची नियुक्ती करणेबाबत.**

उपरोक्त विषयी कळविण्यात येते की, उस्मानाबाद जिल्हा सेतू समिती व त्याअंतर्गत असलेल्या आठ तालुकास्तरीय असे एकुण नऊ सेतू केंद्राचे सन 2017-2018 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करावयाचे आहे. त्यासाठी नोंदणीकृत सनदी लेखापालांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत. त्याबाबतच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणणे आहेत.

1.ईच्छुक सनदी लेखापाल हे सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणीकृत असावेत.
2.लेखापाल परिक्षण कामाचा कमीत-कमी तीन वर्षाचा अनुभव असल्याचे प्रमाणपत्र देणे गरजेचे आहे.
3.शासन निर्देशाप्रमाणे विहीत केलेले नियम व अटी मान्य असल्याचे करारपत्र करुन दयावे लागेल.
4.शासनाच्या निर्देशाप्रमाणे 2016-2017 या वर्षाचे आयकर भरल्याचे प्रमाणपत्र सोबत जोडावे लागेल.
5.सनदी लेखापलाने लेखापरीक्षण अहवालात खालील बाबी प्रामुख्याने प्रमाणित करणे आवश्यक आहे.
अ)योजनेचे सर्व अद्यावत मार्गदर्शन सूचनांचा अभ्यास करुन त्या अनुषंगाने लेखा तपासणी केलेली आहे.
ब)जिल्हा सेतू समितीच्या निधीची उपयोगिता योग्य रितीने झाली आहे.
क)लेखा तपासणी कालावधीत बँकेचा ताळमेळ घालणे.
ड)कुठलाही अग्रीम खर्च दाखविण्यात आलेला नाही.
ई)एका वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी दिलेले अग्रीमाचा अहवालात अंतर्भाव करण्यात आलेला नाही.
फ)वरील प्रमाणपत्राशिवाय संबंधित योजनेकरिता आवश्यक असलेले लेखा प्रमाणपत्रे सनदी लेखापालांनी द्यावी.
6.सनदी लेखापालांनी स्वतंत्र लेखा परीक्षण अहवाल सहा प्रतीत 30 दिवसात जिल्हा सेतू समितीस सादर करणे बंधनकारक राहील.
7.सनदी लेखापालांनी प्रति वर्षासाठी, प्रति सेतू केंद्र याप्रमाणे फीसचा उल्लेख करावा तसेच दरपत्रकामध्ये सर्व कराचा समावेश करुन दरपत्रके या कार्यालयास सादर करावीत. व दरपत्रके दिनांक 04 /06/2018 रोजी दुपारी 16.00 वाजेपर्यंत सादर करावीत.
8.दरपत्रके दिनांक 05 /06/2018 रोजी दुपारी 16.00 वाजता उघडण्यात येतील.
9.देयकातुन नियमानुसार कराची कपात करण्यात येईल.
10.दरपत्रके मंजूर अथवा नामंजूर करण्याचे अधिकार मा.जिल्हाधिकारी यांनी राखून ठेवले आहेत.
11.लेखापरीक्षण हे कार्यालयीन वेळेतच व कार्यालयात येऊनच करावे लागेल.
12.सदर लेखापरीक्षणासाठी दर सोडून इतर भत्ता (प्रवास भत्ता) वेगळयाने देण्यात येणार नाही.

24/5/18

**अध्यक्ष सेतू समिती तथा**
**जिल्हाधिकारी उस्मानाबाद**